# उत्तम शेळ्या व बोकडांची निवड

आबासाहेब पराडे
आचार्य पदवी विद्यार्थी

डॉ. दिलीप देवकर
वरिष्ठ शास्त्रज्ञ (गो संशोधन व विकास प्रकल्प)
महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी

प्रांजली मेश्राम
आचार्य पदवी विद्यार्थिनी

शेळीपालन व्यवसाय करण्याकरीता शेळ्या निवडताना व खरेदी करताना खालील गोष्टींचा विचार करावा.

## शेळीची गुण वैशिष्टे:

शेळयांची निवड करताना शेळयांच्या विशिष्ट जातीचा रंग, रूप, लांबी, रुंदी, उंची, केस, शिंगाची ठेवण, कानाचा आकार व ठेवण, निवड करावयाच्या जातीची उपयुक्तता व उत्पादन क्षमता विचारात घेऊन शेळयांची निवड व खरेदी करावी.

## शरीर वजने:

शेळीपालन जेव्हा व्यवसाय या उद्देशाने करावयाचे असते त्यावेळी नर व माद्यांची निवड त्यांची शरीर वजने विचारात घेऊन करणे अत्यंत महत्वाचे असते. सरासरीपेक्षा जास्त वजन असलेल्या माद्या व नर पैदाशीसाठी निवडल्यास त्यांच्यापासून मिळणारी करडे ही वजनदार, गुटगुटीत आणि निरोगी जन्माला येतात. ज्या करडांची दररोजची शरीरवाढ जोमाने होते, अशी करडे लवकर वयात येतात आणि त्यांची भविष्यातही वजने चांगली असतात.



## शेळीचा आकार:

शेळया निवडताना त्यांच्या शेपटीच्या वरील दोन हाडातील अंतर जास्त असावे. त्यामुळे शेळीला विताना अडचण येत नाही. मान सडपातळ असावी, पुढचे व मागचे चारी पाय सरळ व मजबूत असावेत. पोट मोठे असावे त्यामुळे शेळी भरपूर प्रमाणात चारा खाते व गर्भाची वाढ चांगली होते. वजनदार करडे जन्माला येतात. अशाच शेळयामध्ये जुळी करडे देणेचे प्रमाण जास्त आढळते. शेळयांचे तिन्ही बाजुने निरिक्षण शेळीला समोरुन पाहिले असता तिच्या दोन्ही बाजूने (पोटाच्या छातीच्या) काल्पनिक रेषा काढली असता ती पाठीच्या वर मिळेल. तिचा जमिनीकडे जाणारा आकार जेवढा मोठा तेवढी त्या शेळीची गुणवत्ता अधिक. दुसरी पाचर शेळीला वरुन पाहिले असता पाठीमागील बाजू व डोळयाकडे निमुळता होत जाणारा त्रिकोणाकार. त्याचप्रमाणे शेळीच्या एका अंगास उभे राहुन पाहणी केली असता डोळयापासून पाठीला सरळ रेषा व डोळयापासून सडांच्या (पोटाच्या खालून) ठिकाणापर्यंत येणारा त्रिकोणाकार पाठीमागील भागात जोडला असता, होणारी पाचर. जितक्या मोठ्या किंवा रुंद तितकी शेळीची गुणवत्ता अधिक चांगली समजावी.

## जुळी करडे देण्याचे प्रमाण:

जुळी करडे देण्याचे गुणधर्म आईकडुन तसेच वडिलांकडुन पुढच्या पिढीत उतरत असल्याने ज्या शेळी आणि बोकडापासून जुळी तिळी करडे मिळतात अशाच शेळीची, बोकडाची करडे पैदाशीसाठी वाढविल्यास अनुवंशिक शास्त्रातील नियमानुसार हे गुणधर्म पुढच्या पिढीमध्ये टिकवता येतात किंवा त्यामध्ये वाढही करता येते.

## वर्षातून मिळणारी नियमित विते:

शेळीचा गाभणकाळ हा सर्वसाधारणपणे पाच महिने असतो. विल्यानंतर एक ते दीड महिन्यात जर शेळी पुन्हा माजावर येऊन परत भरली गेली तर अशा शेळया १४ ते १५ महिन्यात दोन विते देतात. अशा नियमित दोन विते देणा-या शेळयांच्या करडांची निवड केल्यास नियमित विण्याचा गुणधर्म पुढील पिढीत टिकवता येतो. त्यासाठी सर्वसाधारणपणे दोन वर्षांत तीन विते देणा-या शेळयांची निवड करावी. परंतु त्यासाठी उत्तम आहार व व्यवस्थापनाची आवश्यकता असते.

## निरोगी आणि चपळ शेळयांची निवड:

निवडलेल्या शेळया, बोकड किंवा करडे अतिशय चपळ, देखणी असावीत पैदाशीच्या शेळयांना कोणत्याही प्रकारचा आजार नसावा. विशेषतः क्षय, जोन्स, बुसलोसिस या रोगापासून मुक्त असल्याची खात्री करावी. त्यांच्यामध्ये कोणतेही व्यंग नसावे. बरेच आजार किंवा शारीरिक दोषी अनुवंशिक आल्यामुळे ते एका पिढीतून दुस-या पिढीत उतरत असतात. ज्या शेळयांना गर्भ टाकण्याची सवय आहे किंवा सोडल्याचे आढळते अशा शेळयांची लक्षपुर्वक नोंद घ्यावी आणि जर तिचा गर्भपात वारंवार होत असेल तर अशी शेळी कळपातून त्वरित काढून टाकावी.

## शेळया खरेदीचा हंगाम:

शेळयांची खरेदी पावसाळयात करु नये. कारण या हंगामात रोगराईची शक्यता अधिक असते. विशेषतः जंत विकाराचा प्रादुर्भाव जास्त असतो. त्यामुळे आपल्या कळपात संसर्गजन्य आजार येण्याची शक्यता संभवते. तेव्हा नेहमी शेळया हिवाळयात खरेदी कराव्यात..

## शेळया खरेदीचे ठिकाण:

शेळयांची खरेदी शक्यतो माहितीतील

शेतक-याकडून करावी. मोठ्या संख्येने शेळ्या खरेदी करावयाच्या असल्यास अनेक शेतक-याकडुन थोड्या थोड्या शेळ्या मिळवाव्यात. शेळयांची खरेदी आठवडा बाजारातून करु नये. तेथे येणा-या बहुसंख्या शेळ्या पैदाशीसाठी निरुपयोगी असतात. बाजारातील शेळयापैकी केवळ ५ ते १० टक्के शेळ्या पैदाशी योग्य असतात. बाजारात येणा-या शेळ्या अनेक गावातुन अनेक कळपातून आलेल्या असतात. त्या शेळयांना संसर्गजन्य रोगाची लागण झालेली आहे किंवा नाही हे माहित नसते किंवा बाजारात तशी लागण होणेची शक्यता जास्त असते बाजारातून शेळ्या खरेदी न करता शेतकऱ्यांकडुनच खरेदी कराव्यात.

### शेळयांचे वय:

पैदाशीसाठी शेळयांची निवड करताना एक ते तीन वर्षे वयोगटातील सशक्त, निरामी व पैदासक्षम शेळ्या निवडाव्यात. निवडलेल्या शेळया खरेदी करुन दूर अंतरावर वाहतुक करावयाची असल्यास विण्यास जवळ आलेल्या गाभण शेळया खरेदी करणे टाळावे कारण वाहतुकीला ताणामुळे शेळयामध्ये गर्भपाताची शक्यता जास्त असते.

### शेळयांची संख्या:

नव्याने शेळीपालन व्यवसाय सुरु करताना सुरवातीलाच जास्त शेळ्या घेऊ नयेत. आपल्याकडे १०० शेळयांच्या संगोपनाच्या सोयी उपलब्ध असल्यास प्रथमतः फक्त २५ शेळ्या आणि एक बोकड विकत घ्यावा व टप्पा टप्प्याने शेळयांची संख्या वाढवावी. पंचवीस शेळयापासुन ६ महिन्यामध्ये जवळजवळ ४० ते ५० व वर्षभरात ७० ते ८० शेळयांचा कळप तयार होईल. जन्मलेल्या करडांपैकी मादी करडे पैदाशीसाठी ठेवुन नर करडांची विक्री करावी. पहिल्या सहा महिन्यातील नर करडे विकून नविन शेळ्या खरेदी कराव्यात. यामुळे शेळ्या खरेदीसाठी भांडवली खर्च कमी लागेल. शिवाय एक वर्षाचा शेळी संगोपनाचा प्रत्यक्ष अनुभव मिळेल. त्यातुन आत्मविश्वास वाढेल आणि व्यवसाय टिकुन राहिल. अनुभव नसताना सुरवातीलाच भरपुर शेळ्या खरेदी केल्या तर व्यवस्थापना अभावी मृत्युचे प्रमाण वाढते व व्यवसाय बंद करण्याची वेळ येते..

### पैदाशीच्या बोकडाची निवड:

विशिष्ट जातीचा कळप निर्माण करायचा असेल तर प्रजननांसाठी बोकड निवडताना, ज्याच्या ठिकाणी त्याजातीचे गुणधर्म असतील असाच उत्कृष्ट नर निवडावा. त्यामध्ये अनुवंशिक दोष नसावेत. तो सशक्त, निरोगी व चपळ असावा. त्याचे जन्मतः वजन, लांबी, रुंदी व उंची चांगली असावी तसेच त्याच्या वजन वाढीचा दर चांगला असावा. ज्या नर करडांच्या अंडकोषात दोन्ही वृषण असतील तीच नर करडे प्रजोत्पादनासाठी निवडावीत. ज्या नर करडांच्या अंडकोषात एकच वृषण असते. त्या बोकडामध्ये शुक्रजंतु तयार होण्यासाठी जे तपमान आवश्यक असते ते राहत नाही. त्यामुळे चांगले शुक्रजंतु तयार होत नाहीत. त्याचा परिणाम शेळया गाभण राहण्यावरती होतो.

प्रजननासाठी बोकड निवडताना तो जुळया किंवा तिळया जन्मलेल्या करडांमधुन निवडावा कारण हा गुणधर्म अनुवंशिक असल्यामुळे पुढच्या पिढीतही जुळी किंवा तिळी करडे देण्याचे प्रमाण वाढते. एका वेळी जादा करडे मिळणे हे व्यवसायातून वाढीव उत्पन्न मिळण्याच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक असते. पैदाशीचा नर निवडताना त्याची पुर्वीची वंशावळ किंवा उत्पादन क्षमतेच्या नोंदी उपलब्ध असतील तर त्या नोंदीचा जरूर उपयोग करुन घ्यावा. कारण अशा नोंदीच्या आधारे करण्यात आलेली निवड ही नेहमी चांगली असते. पैदाशीच्या नराची निवड करताना त्यांचे अंडकोष शरीरापासून फार लोंबकळत नाहीत ना याची खात्री करावी. अंडकोषामध्ये दोन्ही वृषणे सुटसुटीत फिरणारे असावेत. अंडकोष फार टणक नसावा. शिश्नाच्या पुढील भागावर असलेल्या कातडीमध्ये अनियमित मांसल वाढ झालेली नसावी. पैदाशीचा नर निवडताना त्याच्या शरीरावर किंवा इतर अवयवांमध्ये पुर्वी कसला तरी जुनाट आजार झाल्याचे चिन्ह किंवा लक्षण नसावे. त्याला कुठलाही संसर्गजन्य रोग झालेला नसावा. त्यासाठी जरुर पडल्यास त्याची वैद्यकीय तपासणी करून घ्यावी, नाही तर पुढील सगळा रोगग्रस्त होण्याची शक्यता असते. तसेच शक्य असल्यास निवडलेल्या बोकडाच्या विर्याची तपासणी करुन घ्यावी. पैदाशीच्या नरामध्ये शिंगे नसणे हा गुणधर्म वांझपणाशी संबंधित आहे. त्यामुळे फक्त शिंगे असणाराच बोकड पैदाशीसाठी निवडावा.

पैदाशीसाठी निवडलेला बोकड इतर करडांच्या तुलनेने भरभर वाढणारा आणि वजनदार असल्याने लवकर वयात येतो. शेतकरी बोकडाचे वय ६ ते १२ महिने झाले की लगेच पैदाशीसाठी उपयोगात आणतात. अशा बोकडाकडुन भरलेल्या शेळ्या गाभण राहतात, परंतु अशा बोकडाकडुन शेळ्या भरु नयेत कारण ज्या नरांचा लहान वयात पैदाशीसाठी उपयोग केला जातो, त्यांचे चांगले पोषण होत नाही आणि त्याचा अनिष्ठ परिणाम त्यांच्या भविष्यातील प्रजोत्पादन क्षमतेवर होतो. पैदाशीसाठी उपयोगात आणावयाच नर साधारणपणे २ ते ७ वर्षे वयाचे असताना चांगली पैदास मिळते.. त्यांच्यापासुन जन्मणारी करडे वजनदार तर असतातच शिवाय शेळ्यांमध्ये जुळी करडे देण्याचेही प्रमाण वाढते. पैदाशीचे नर जरी ७ वर्षे वयापर्यंत चांगली पैदास करीत असले तरी प्रत्येक नर हा एका कळपात वापरण्यास सुरुवात केल्यास फक्त दोन वर्षेच वापरावा. नंतर तो दुस-या कळपात वापरावा, कारण पैदाशीसाठी नरांचा उपयोग करताना त्याच नरांच्या पाठी किंवा आईवर त्याचा उपयोग कधीच करु नये तसेच जवळच्या नात्यातील प्रजनन टाळावे. यामुळे पैदा होणा-या पुढील पिढयातील करडांमध्ये दोष निर्माण होत नाहीत. या कारणामुळेच पैदाशीसाठी नर निवडताना तो आपल्या कळपातील न निवडता इतर कळपातून निवडावा.

(संपर्क: +९१ ९१७५७५७४८७)

★ ★ ★